कार्यालय, पोलीस अधीक्षक, यवतमाळ
एल.आय.सी. चौक, ता. व जि. यवतमाळ पिन कोडः ४४५००१
Email:- sp.yavatmal@mahapolice.gov.in

---

## यवतमाळ जिल्हा पोलीस शिपाई चालक भरती - २०२२-२३

## पोलीस शिपाई चालक पदाच्या गुणांचे तात्पुरते एकत्रित गुणपत्रकाबाबतचे

## शुध्दीपत्रक

यवतमाळ जिल्हा पोलीस आस्थापनेवरील रिक्त असलेल्या २१ पोलीस शिपाई चालक पदासाठी दिनांक १९/०६/२०२४ ते दि. २२/०६/२०२४ व दि.२७/०६/२०२४ या कालावधीत मैदानी चाचणी व दि. ०१/०७/२०२४ ते दि.०४/०७/२०२४ या कालावधीत कौशल्य चाचणी घेण्यात आली होती.

लेखी चाचणी दिनांक १४/०७/२०२४ रोजी घेण्यात आली होती. मैदानी चाचणी व लेखी चाचणीमधील प्राप्त गुणांची एकत्रित यादी पोलीस कवायत मैदान, पळसवाडी, दारव्हा रोड, यवतमाळ येथील सूचना फलकावर तसेच कार्यालयाचे संकेतस्थळावर https://yavatmalpolice.gov.in यावर दिनांक ०७/०८/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. यामध्ये महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ मधील तरतुदी व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारित तरतुदीनुसार उमेदवारांना पोलीस शिपाई पदाच्या लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्के पेक्षा कमी गुण असलेले उमेदवार हे अपात्र समजण्यात येतील असा मुददा समाविष्ट करण्यात होता. याबाबत खालीलप्रमाणे **शुध्दीपत्रक** काढण्यात येत आहे.

- महाराष्ट्र पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) २०१९, पोलीस शिपाई चालक (सेवाप्रवेश) दुसरी, तिसरी, चौथी सुधारणा-२०२२ मधील तरतुदी तसेच अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके यांचे कार्यालयाचे पत्र.क्र.अपोमसं/प्रशिक्षण/पो.शि.भरती २०२२-२०२३/१७३/२०२३ मुंबई, दिनांक ०६/०६/२०२४ चे सन २०२२-२०२३ ची पोलीस शिपाई भरती प्रक्रिया कार्यपध्दती व महाआयटी कडून त्यांचे वेबसाईट ला प्रसिध्द केलेल्या पोलीस भरती संबंधाने उमेदवारांकरिता सूचनामध्ये पोलीस शिपाई/पोलीस शिपाई चालक/बॅण्डसमन/सशस्त्र पोलीस शिपाई /कारागृह शिपाई भरती-२०२३ करिता उमेदवारांसाठी सूचना व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या सुधारित तरतुदीनुसार **पोलीस शिपाई चालक पदाच्या लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळवणे अनिवार्य आहे असे सदर नियमामध्ये कुठेही नमूद नाही.**
- तरी दिनांक ०७/०८/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या पोलीस शिपाई चालक पदाच्या एकत्रित गुणाच्या यादीतील उमेदवारांकरिता सूचना पत्रामध्ये नमूद असलेला मुद्दा पोलीस शिपाई चालक पदाच्या लेखी परीक्षेच्या प्राप्त गुणांकरिता लागु नाही असे वाचावे.

ठिकाण : यवतमाळ
दिनांक : २०/०८/२०२४

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.